Each year, billions of trash and pollutants enter the ocean

‘दृष्टिकोन’ लेखमाला : लेख चौथा

# कचरा : कुणाची जबाबदारी ?



केतकी घाटे

Start with your action

ऑगस्ट २०२०

आज खूप दिवसांनी सुजाता-समीर घरी येणार म्हटल्यावर जुई आनंदात होती. सुजाता तिची गावाकडची मैत्रीण, तिच्याहून चार पाच वर्षाने मोठी, पण घट्ट मैत्री होती. दोघी होस्टेलवर काही काळ एकत्र होत्या पण गेल्या वर्षी सुजाताच लग्न झालं आणि जुई हॉस्टेल सोडून फ्लॅटवर शिफ्ट झाली तेव्हापासून दोघींचीही निवांत भेट झालीच नव्हती. गेल्या वर्षीच्या देवराई सहलीनंतर थेट आज तो योग जुळून आला होता. सुजाता आणि तिचा नवरा समीर दोघेही आय टी क्षेत्रात नोकरी करत होते. त्यामुळे त्यांना सोयीचा असा रविवार बघून जुईच्या घरी भेटायचं ठरलं. सुजाता समीरच्या आधी पोहोचली. मुद्दाम मनसोक्त गप्पा मारण्यासाठी. ती आल्या आल्या दोघींच्या गप्पा अशा सुरु झाल्या की दोन तास कसे गेले कळलंच नाही. आणि स्वैपाक करणाऱ्या बाई आल्याच नाहीयेत हे दोघींना उमजलं. मग दोघीनी बाहेरून जेवण मागवायचं ठरवलं. सुजाताने समीरला फोन करून वाटेतल्या एका खानावळीतून जेवण पार्सल आणायला सांगितलं. थोड्याच वेळात समीर

जेवण घेऊन हजार झाला. जुईच्या हातात पिशवी देत म्हणाला, 'हे घ्या मॅडम जेवण.'

त्यातल्या विविध डिस्पोझेबल प्लॅस्टिकच्या पिशव्या, फॉईलमधील अन्न आणि थमॉकोलच्या प्लेट बघून बघून जुई म्हणाली, 'समीर, अरे डबे घेऊन का नाही गेलास आणि ह्या प्लेट्स कशाला आणल्यास?'

'कशाला डबे. तो प्लॅस्टिकमध्ये मस्त पॅक करून देतो. उगा सांडून राडा होत नाही. आणि त्या प्लेट्स पण फुकट मिळाल्या मग घेऊन टाकल्या. आणि हे बरं की काम वाचेल तुझं. ह्याच वापरू जेवायला. आराम मिळेल रविवारी जरा.'

'कुणाला आराम ?'

'तुलाच की! तुला घासायला नको. बाई नाहीये ना. फेकलं सगळं की झालं. आणि तुला काय प्रॉब्लेम आहे डिस्पोझेबल मधून अन्न आणायला? केवढी सोय आहे ती.'

'अरे कचरा वाढवतो आपण डिस्पोझेबल आणून!'

'अग पण किती सोयीचं होतं ते ! ते डबे न्या वगैरे भानगड नाही. प्लॅस्टिक निर्मिती हा उत्तम शोध लावला

आहे माणसाने. अनेक गोष्टी सुकर झाल्या आहेत त्यामुळे.’

‘हं .. शोध उत्तम आहे याविषयी मला शंका नाही पण ते ‘डिस्पोझेबल’ केलं आहे ह्याविषयी प्रॉब्लेम आहे.’

‘प्रॉब्लेम कसा काय? तुला थोडीच आवरावा लागतो तो कचरा?’

‘हो मला नाही आवरावा लागत कचरा पण आपण दुसऱ्या कुणाला तरी कामाला लावतो. कचरा साफ करण्यासाठी.’

‘मग काय झालं? कचरा वेचकांचं कामच आहे ते. आपण कर भरतो सरकारला हे सगळं नीट मॅनेज करण्यासाठी. ती त्यांची जबाबदारी आहे कचऱ्याची नीट विल्हेवाट लावण्याची. आपली नाही !’, पुणेरी आत्मविश्वास आणि स्पष्टता बघून जुई जरा दबून जात असे.

‘हो बरोबर.. पण सरकारला हे झेपत नाहीये नीट, तर त्यात आपण त्यांना मदत करायची की आधीच कच्च्या असलेल्या यंत्रणेचा ताण वाढवायचा?’

‘हो मला पटतं आहे जुई तुझं’, सुजाता म्हणाली, ‘पण मी पण इतके दिवस सोयच बघत आले आहे. नीट विचार केला नाहीये ह्याविषयी.’

'मग काय दर वेळी बाहेर जाताना पिशव्या, डबे सगळं घेऊन जायचे की काय?', पुनःश्च समीर.

'हो. त्यात कठीण काय आहे? आणि असं कुठे रोज रोज आपण एवढं बाहेरून काही आणत असतो, दूध, भाजी सोडता. रोज सकाळी बाहेर पडण्यापूर्वी नीट नियोजन केलं तर हवं ते बरोबर नेणं शक्य आहे की. मी आणि अनेक जण गेली अनेक वर्ष करतच आहेत की हे. आपल्या आजी आजोबांच्या वेळी तर पर्यायच नव्हते असे त्यामुळे त्यांना तर हीच रोजची सवय होती', जुई म्हणाली. एकीकडे ती सगळे पदार्थ प्लास्टिक आणि फॉईलमधून भांड्यांमध्ये काढत होती, 'गरम पदार्थ प्लॅस्टीक मधून आणणे तर आरोग्याच्या दृष्टीने देखील घातक.'

'खरंय !,' सुजाता विचार करून म्हणाली, 'आपल्याला केवळ आता सोपे पर्याय आहेत म्हणून आपण ते निवडतो.'

'पण त्यात अपराधी वाटण्यासारखं काय आहे. सरकारी सिस्टीम सुधारल्या की प्रॉब्लेम आपोआप कमी होईल', समीर म्हणाला.

'अपराधी वाटत आहे कारण आपण हा कचरा निर्माण केला आहे, ज्याची विल्हेवाट वेगळाच माणूस लावणार,

आणि त्याचे परिणाम आणिक तिसराच माणूस भोगणार आणि बरोबरीने आपली धरणी माता ! जिथे कचरा टाकला जातो ती जागा कधी पाहिली आहेस का ? त्या देवाची उरळीची जनता हे सगळं सहन कशी करते ह्याचंच नवल वाटतं. कीव येते त्यांची आणि आपली घृणा. इतका भयंकर वास असतो तिथे. त्यातून रोगराई ना फ़ैलावली तरच नवल. नेटवर भरपूर फोटोज आणि विडिओ मिळतील बघ त्याचे', जुई म्हणाली. समीरने लगेच फोन उघडून काही गोष्टी बघायला सुरवात केली.

सुजाता म्हणाली, 'खरंतर आपल्या सरकारने जर का त्या कचऱ्याचं वर्गीकरण नीट केलं आणि कुजणारा कचरा वेगळा काढला तर एवढा प्रॉब्लेम व्हायचा नाही. परवाच मी वाचत होते कचऱ्यातला ६० ते ७० % भाग हा कुजू शकणारा म्हणजेच मातीत मिसळू शकणारा असतो'.

'एक्झॅटली त्याकरता वर्गीकरण गरजेचे आहे. पण हे वर्गीकरण होत नाही म्हणून मग तो ६० % कचरा विघटनशील असूनही कुचकामी होतो. अ-विघटनशील कचऱ्याबरोबर नुसता पडून राहतो आणि आवश्यक त्या वेगाने आणि योग्यप्रकारे कुजत नाही. तो वेगळा काढला

तर मोठाच प्रॉब्लेम कमी होईल आणि मोठ्या प्रमाणात खत निर्मिती होईल', जुईने स्पष्टीकरण दिलं.




'पण उरलेल्या ३० ते ४० % अ-विघटनशील कचऱ्याचं काय होणार जुई ? तो तसाच ढिगात पडून राहणार का, न कुजता ?', सुजाताने प्रश्न केला.

‘सगळंच अ-विघटनशील पडून राहणार नाही. त्यातली अनेक मटेरिअल्स रियूज किंवा रिसायकल किंवा अपसायकल करता येतात म्हणजे ती पुन्हा वापरायोग्य करता येतात. प्लास्टिक बाटल्यांचं बघ ना. रियुज म्हणजे ह्या बाटल्या कापून कुंड्या म्हणून वापरणे, ठिबक सिंचनासाठी वापरणे, भिंतीत किंवा slabमध्ये फिलर म्हणून वापरणे इत्यादी. रिसायकल म्हणजे ह्या बाटल्या वितळून परत प्लास्टिक तयार करणे किंवा त्यापासून वेगवेगळ्या वस्तू तयार करणे उदा. कार्पेट, प्लॅस्टिक कॅरी बॅग, डिझेल इत्यादी. असा पुनर्वापर केल्याने नवीन संसाधनांचा उपसा कमी केला जातो ही मोठी जमेची बाजू आहे. आणि अपसायकल म्हणजे प्लास्टिक आहे तसं



** Work by Studio Alternatives*

वापरून वस्तू तयार करणे. अपसायकलिंगमध्ये गोष्टी सुंदर करण्यावर भर असतो जेणेकरून त्या ग्राहकाच्या पसंतीस उतराव्या.'

'वा हे तर फारच भारी आहे. म्हणजे आपण पण शक्यतो रिसायकलिंग गोष्टी घेण्यावर भर दिला पाहिजे. हल्ली काही वस्तूंवर लिहिलेलं पण दिसतं विशेषतः पार्सलच्या बॉक्सवर खूण असते रिसायकलिंगची.'

'हं.. एका दृष्टीकोनातून ठीक आहे कारण आपण संसाधनांचा नवीन उपसा थांबवतो. पण त्याने प्रदूषण फार कमी होत नाही. कारण रिसायकल किंवा अपसायकल एकतर कमी प्रमाणात होतं आणि ते करण्यात बहुतांश वेळा भरपूर ऊर्जा वापरली जाते आणि पर्यायाने प्रदूषण होतं. हे शब्द कितीही निसर्गपूरक वाटत असले तरी ते दरवेळी तसे असेलच असे नाही.'

'ओह म्हणजे काय जरा स्पष्ट करून सांगशील का ?', सुजाता म्हणाली.

'हो सांगते. बाजारात काही वस्तू अशा पण आहेत ज्यांनी प्लास्टिकचा प्रश्न तात्पुरता सोडवला आहे पण ज्याचा भविष्यात प्रॉब्लेम होऊ शकतो. काही जण प्लास्टिक आणि अजून इतर काही मटेरियल्स वापरून कॉम्पोझिट

म्हणजे दोन्ही मिळून एक वस्तू तयार करत आहेत. त्या वस्तूचा वापर संपून ती जीर्ण झाली की दोन मटेरियल्स वेगळी करणे मोठच काम असेल.’

‘म्हणजे कळलं नाही. उदाहरण सांग ना’, सुजाता म्हणाली.

‘हं.. हे बघ हल्ली काही जण मायक्रो प्लास्टिक म्हणजे बिस्कीट, चॉकलेटचे रॅपर प्लास्टिकच्या बाटल्यात गच्च भरून त्या वीट म्हणून बांधकामात वापरत आहेत सिमेंटबरोबर ! भविष्यात भिंत पडली की ते परत वेगवेगळं करणं अवघड आहे. आणि जरी वेगळं केलं तरी परत प्लास्टिकच काय करायचं प्रश्न राहणारच. त्यामुळे ते सगळ परत कचरा डेपोला जाऊन पडणार.’

‘ओह खरंच की ! पण एका दृष्टीने हा बरा मार्ग आहे छोटे छोटे तुकडे एकत्र करायचा. निदान एकत्रित तरी राहतील नाहीतर तो कचरा पाला पाचोळ्यासारखा सर्वत्र उडत राहतो.’

‘हो तसा उपक्रम चांगला आहे. पण कधीतरी वाटतं अशा बाटल्या बनवून रिसायकलिंगला देणे चांगले. निदान नवीन प्लास्टिक बनवणे कमी होईल याने. पण फिरून

परत भोपळे चौकातच. रिसायकलिंगला ऊर्जा लागणारच!'

'काय ग बाई .. पण मग याला अल्टिमेट पर्याय काय ?'

'प्रत्येकाचे वेगवेगळे पर्याय असू शकतील. पण मला वाटतं, प्लास्टिकसारखी मटेरियल्स वापरणे शक्यतोवर टाळावे. जेवढं गरजेचं म्हणून आपण आणतो ते 'वैयक्तिक घरगुती पातळीवरच' दीर्घकाळ reuse करत वापरत राहावं. ऊर्जा न वापरता पुनर्वापर करणे जास्त योग्य ! आपल्या आज्ज्या हे कायम करत आल्या आहेत ते सगळ्यात योग्य. उदाहरणार्थ साडीपासून गोधडी, गोधडीपासून पाय पुसणं आणि अगदी कुजायला आलं की जाळण्यासाठी बोळा. प्लास्टिकच्या बाबतीत वस्तू अगदी जीर्ण झाली की अगदी शेवटी रिसायकलिंगला द्यावी.'

'हं.. पण तू म्हणतेस तसं प्रत्येक जण असं वैयक्तिक पातळीवर वस्तू रियूज करत राहील हे अशक्य दिसतंय जुई. आपल्या सवयी खूप बदलल्या आहेत आता. आपल्या घरांमध्ये रोज इतक्या मोठ्या प्रमाणात प्लास्टिक सदृश कचरा येतो की तो सगळा वापरला जावा अशी आपली जीवनशैलीच नाहीये. काही प्रमाणात पुनर्वापर ठीक आहे

पण एवढा मोठा व्हॉल्यूम रोज घरात ऍबसॉर्ब होणं शक्य नाही ग.'

'हं .. खरंय सुजा !', विचार करत जुई म्हणाली, 'असले उपाय फार कमी जण करतील. सार्वत्रिक सोपे उपाय हवे. मग सद्यस्थितीत सरकारचा लोड कमी करणे हा एकमेव पर्याय मला दिसतो आहे. किमान "वर्गीकरण" करून सरकारला कचरा देणे ही मला प्रत्येक नागरिकाची किमान नैतिक जबाबदारी वाटते. आणि बरोबरीने दुसरा हा. त्यातला अ-विघटनशील कचरा "स्वच्छ करून देणे",' असं म्हणत जुई ओट्यापाशी गेली आणि तिने मगाशी रिकाम्या केलेल्या सगळ्या डिस्पोझेबल पिशव्या हातावर चटकन उलट्या करून स्वच्छ धुतल्या आणि बेसिन जवळच्या टाइलवर उभ्या चिकटवून वाळवण्यासाठी निथळत ठेवल्या. 'हा स्वच्छ केलेला कचराच पुनर्वापरायोग्य ठरतो आणि पुनर्वापरासाठी सहज दिला जातो. अस्वच्छ कचरा सरळ कचरा डेपोच्या ढिगाऱ्यातच जातो. काही अंशी काही संस्था किंवा सरकार तो वर्गीकरण करून स्वच्छ करून मग रिसायकलिंगला पाठवतात. पण हे दुहेरी काम आणि ऊर्जा वापरणार काम अगदी सहज टाळता येऊ शकतं जर




प्रत्येकाने सगळाच कचरा नीट स्वच्छ आणि वेगवेगळा ठेवला तर.'

ते ऐकून इतका वेळ मोबाईलमध्ये डोकं खुपसून बसलेला समीर म्हणाला, 'बापरे तुला बरा वेळ होतो हे असलं सगळं धुवायला वगैरे! आणि काय करणार तू ह्या स्वच्छ

पिशव्याच? आपल्या सरकारने काही असं वेगळं करून द्या वगैरे म्हटलेलं नाही.'

'मी या पिशव्या एका प्लॅस्टिकपासून डिझेल निर्मितीच्या कारखान्याला पाठवते. समीर, तुला खरंच वाटतंय मला खूप वेळ लागला हे करायला? मोजून बघ हवं तर. एक मिनिट सुद्धा लागत नाही चार पाच पिशव्या धुवायला. एरवी सिंकमध्ये २०-२५ वस्तू तर नक्कीच असतात घासायला त्यात दोन चार पिशव्या वाढल्याने काहीही बिघडत नाही. तुला धुवायच्या नसतील तर मोलकरणींना ट्रेन कर'.

'आता नाही वाटतं पाणी वाया जात तुझं..  कचरा धुण्यात !'

'आपण भांडी धुतो तेव्हा पाणी 'वाया' जातं असं म्हणतो का ? नाही. कारण ते गरजेचंच आहे. दर वेळी भांडी फेकून देऊन आपण नवीन भांडी विकत नाही आणत. तेवढं पाणी 'वापरून' आपण भांडी परत परत वापरण्याचा मोठा फायदा मिळवत असतो. तसंच प्लॅस्टिकसारखी मटेरियल्स परत परत वापरण्यासाठी ती स्वच्छ केली तर पाणी वाया न जाता वापरलं जाईल असं म्हणणं जास्त योग्य.'

‘हं... मान्य !,’ समीर म्हणाला, ‘भारी सिस्टीम आहे तुझी. कचऱ्यापासून इंधन निर्मितीला मदत. मग अशा सवयी, सिस्टीम लावल्या तर प्लॅस्टिक वापरायला हरकत नाही.’

‘नाही रे बाबा ! हा शेवटचा मार्ग आहे. रामायण सांगून झालं. आता रामाची सीता कोण काय विचारतोस. असो. तरीही मी तुला चार श्लोकात रामायण सांगते परत ! कचरा व्यवस्थापनात चार ‘R’ महत्वाचे आहेत - Refuse, Reduce, Reuse आणि शेवटी Recycle.’ पहिला R आहे कचरा निर्मिती कमी करण्यासाठी. नवीन गोष्टी ज्यातून कचरा निर्मिती होते त्या विकत घेणं नाकारणे. थोडक्यात शॉपिंग करूच नये.’

‘वा हे बेष्ट आहे ! पटलं मला. सुजाताला पटणं अवघड आहे मात्र’, समीर डोळा मारत म्हणाला.

‘हं.. तिने मग सुरवातीला पुढचा R वापरावा. वस्तू नाकारता येणं शक्य नसेल तर वस्तू वापरण्याचं प्रमाण कमी करणे. दोन चार चपला, बूट घरात असताना अजून एक घेऊ नये.’

‘ओय बापरे हे कठीण आहे ग’, सुजाता म्हणाली, ‘साडी, पंजाबी सूट, जीन्स, स्कर्ट सगळ्यावर वेगवेगळी चप्पल पाहिजे की ग.’

‘हा हा ! काही अंशी मान्य आहे पण एकदा का आपण ह्या मार्गाला लागलो की स्मार्ट होतो आणि मग पर्याय सुचतात बरोबर. एक साधं म्हणजे Reduce आणि Reuse असं एकत्र अमलात आणायचं. आपल्या मैत्रिणींच्या गटात. ज्या वस्तू आपण वापरत नाही त्या इतरांना द्यायच्या. इतरांच्या आपण वापरायच्या. थोडक्यात barter करून पण नवीन वस्तू विकत घेण्याला, पर्यायाने कचरा निर्मितीला आळा बसू शकतो. हे पण काही जणांना कठीण वाटेल तर अशा लोकांनी आपापला उंबरठा ठरवायचा आणि वस्तू खरेदी शक्य असेल तरी थांबवायची. मानसिकतेत बदल महत्त्वाचा ! आणि शेवटी वस्तूंचं आयुष्य संपलं की रिसायकलिंग आहेच. आणि तेही शक्य नसेल तर शेवटी कचरा डेपो. असं व्यवस्थापन केलं तरच धरणीमातेवरचा ताण कमी होईल. मातीत प्रदूषण होणार नाही. भूजलात भेसळ होऊन रोगराई पसरणार नाही. आमेन !’

‘आमेन,’ समीर आणि सुजाता एकदम म्हणाले, ‘चला आता अशा रीतीने ही साठा उत्तराची कहाणी सुफळ संपूर्ण झाली अशी घोषणा माझ्या पोटातले कावळे करत आहेत’, समीर म्हणाला.

‘कहाणी कसली.. रामायण आहे.. चांगलं मोठं पण ते नंतर कधी बघू... आत्ता जेऊया चला’, जुई म्हणाली आणि तिने ताट-वाट्या मांडायला सुरवात केली.

सुजाता मात्र समीरने आणलेल्या थर्माकोलच्या प्लेट्सकडे बघत विचारात गुंतली होती.

❖ ❖ ❖

